# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स : २२६९२१०२/२२६९०००७.

तार - EDUTECH E-mail : dte_4a@rediff.com Internet :http/www.dte.org.in


**परिपत्रक** | क्रमांक :-४-४अ/आस्था/पीएचडी रजा/२०१३/४३८

कालमर्यादित दि.३० सप्टेंबर, २०१३ | दिनांक :- 13 SEP 2013

प्रति,

सर्व सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई /पुणे / नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय :- **सन २०१४-१५ मध्ये पीएच.डी. साठी नोंदणी करण्यासाठी अध्यापकांना प्रतिनियुक्ती देण्याचे / अध्ययन रजा मंजूर करण्याचे प्रस्तावांबाबत**

असे निदर्शनास आले आहे की, पीएचडी करण्यासाठी अध्ययन रजा अथवा प्रतिनियुक्तीसाठीचे प्रस्ताव संबंधित विद्यापीठाने / संस्थेने नोंदणी करणेसाठी नेमून दिलेल्या अंतिम दिनांकाचे आसपास संचालनालयाकडे प्राप्त होतात. काही प्रकरणी अध्यापकांनी ६० दिवसाचा पूर्वतयारीचा (Preparatory) कालावधी पूर्ण केल्यानंतर असे प्रस्ताव प्राप्त होत असल्याने कागदपत्रांची छाननी करणे आणि निकषानुसार पडताळणी करुन ते शासनाला सादर करण्यास विलंब होतो. अशा प्रकरणी संबंधित अध्यापकांकडून त्यांचे प्रस्ताव मंजूरीसाठी सातत्याने संचालनालयाकडे किंवा शासनाकडे तगादा लावला जातो.

अध्यापकांचा असा सर्वसाधारण समज असतो की, संस्थाप्रमुखाच्या स्तरावरुन एकदा संबंधितांना पीएचडी नोंदणीसाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले की, संबंधितांचे अध्ययन रजा / प्रतिनियुक्ती प्रस्ताव तंत्रशिक्षण संचालनालयाकडून शिफारशींसह शासनाकडे पाठविणे क्रमप्राप्त आहे. काहीवेळा असेही निदर्शनास आले आहे की, निकषामध्ये न बसणा-या प्रकरणीसुध्दा संस्थाप्रमुखांकडून ना-हरकत प्रमाणपत्र दिले जाते.

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या स्तरावर प्रस्तावाची छाननी करताना संबंधित संस्थेत व विद्याशाखेत अध्यापकांची उपलब्धता, सेवाजेष्ठता आणि पात्रता, पीएचडी करण्याबाबतची अनिवार्यता व पीएचडी केल्यानंतर त्याचा शासनाला / संस्थेला व विद्यार्थ्यांना होणारा फायदा या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन एकूण किती अध्यापकांना पीएचडी करण्यासाठी प्रतिनियुक्त करणे शक्य होईल याचा सर्वांगिण विचार करुन कमाल मर्यादेत नेमक्या प्रस्तावांवर संचालनालयाकडून शिफारशी करणे शक्य होते. ही सर्व कार्यवाही सुकर होण्यासाठी पीएचडी संबंधीच्या प्रस्तावांबाबत शिफारस करण्यासाठी संचालनालयाच्या स्तरावर निकष निश्चित करण्यात आलेले असून त्यासाठी कार्यपध्दतीसुध्दा निश्चित करण्यात आलेली आहे.

सहसंचालक, तंत्रशिक्षण, वि.का. औरंगाबाद
8813
दिनांक 23 SEP 2013

\\192.168.1.9\desk4a\Leena\misc\ROletter.doc

त्यास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, ज्या अध्यापकांना गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत पीएचडीसाठी प्रतिनियुक्ती वा अध्ययन रजा घेऊन २०१४-१५ मध्ये पीएचडी करावयाची असेल, अशा अध्यापकांचे प्रस्ताव त्यांचे अर्ज संस्थाप्रमुखांच्या शिफारशींसह एकत्रितपणे खालील तपशीलासह विभागीय कार्यालयाकडून तंत्रशिक्षण संचालनालयाकडे दि.३० सप्टेंबर, २०१३ पर्यत कोणत्याही परिस्थितीत प्राप्त होणे आवश्यक आहे. विहीत मुदतीनंतर प्राप्त अर्जांचा २०१४-१५ साठी विचार केला जाणार नाही, ही बाब वेळीच अशा अध्यापकांच्या निदर्शनास आणून दयावी.

पीएचडी साठी अर्ज करणा-या अध्यापकांचा विभागनिहाय तपशील सोबत जोडलेल्या विवरणपत्रात सादर करावा.

( दयानंद मेश्राम )
सहसंचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,
**प्राचार्य,**
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद
शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद
**प्राचार्य**, शासकीय तंत्रनिकेतन,
औरंगाबाद/जालना/अंबड/जिंतूर/हिंगोली/नांदेड/बीड/उस्मानाबाद/पु.ला.शा.तं.लातूर/शा.नि.म.तं.लि.लातूर
**उपसचिव**, महाराष्ट्र राज्य, तंत्रशिक्षण मंडळ, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

पृ.पत्र क्र.विकाऔ/आस्था-१/२०१३/ ७२८५
दिनांक : 27 SEP 2013

यांना कळविण्यात येते की, संचालनालयाच्या वरील पत्रान्वये ज्या अध्यापकांना गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत पीएचडीसाठी प्रतिनियुक्ती वा अध्ययन रजा घेऊन २०१४-१५ मध्ये पीएचडी करावयाची असेल, अशा अध्यापकांचे प्रस्ताव त्यांचे अर्ज संस्थाप्रमुखांच्या शिफारशींसह एकत्रितपणे खालील तपशीलासह तात्काळ या कार्यालयास पाठविण्यात यावे. तसेच पीएचडीसाठी अर्ज करणा-या अध्यापकांचा विभागनिहाय तपशील सोबत जोडलेल्या विवरणपत्रात सादर करावा.

**प्र.सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद**

प्रत - या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना माहितीस्तव, तसेच वरील पत्र या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी.

३.

विभागीय कार्यालयाचे नाव :-

| अनु.क्र. | अध्यापकाचे नाव | पदनाम व विद्याशाखा | संस्थेचे नाव | नियुक्तीचा दिनांक | परिविक्षा कालावधी पूर्ण झाला आहे किंवा कसे? पूर्ण झाला असल्यास शासन आदेशाचा क्र. व दिनांक | हयापूर्वी पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रतिनियुक्ती / अध्ययन रजा मंजूर झाली असल्यास त्याचा तपशील | अर्जदाराचे प्रतिनियुक्ती / अध्ययन रजेसाठीचे पर्याप्त समर्थन (संक्षिप्त) | संबंधित विद्याशाखेतील संस्थेतील | | | यापूर्वी प्रतिनियुक्त संबंधित विद्याशाखेतील अध्यापक पीएचडी / उच्चशिक्षण घेऊन परत आले असल्यास त्यांचे नाव व संस्थेत परत रुजू झाल्याचा दिनांक | प्रतिनियुक्तीला ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत सहसंचालकांचे स्वयंस्पष्ट, अभिप्राय व शिफारस | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| | | | | | | | | | | | | | |

सहसंचालकांची स्वाक्षरी